# <u>जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार</u>

## <u>जाहिरात</u>

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार अंतर्गत लोक अभिरक्षक कार्यालय नंदुरबार येथे ०१ शिपाई पद भरावयाचे आहे. सदरील नेमणुक पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असून संबंधीतास कंत्राटीचे कालावधी पूर्ण होण्यापुर्वी केव्हाही कामावरून कमी करता येईल.

उमेदवाराने दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राव्दारे (आरपीएडी) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह किंवा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत प्रत्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार येथे त्याचे नाव लिफाफ्यावर लिहुन अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांच्याकडे दिनांक १५/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपावेतो अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने आपले अर्ज पाठवावेत/सादर करावेत. पोष्टाने अर्ज सादर करावयाचा असल्यास सदर अर्ज **" सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय आवार, टोकरतलाव रोड, ४२५४१२"** या पत्त्यावर पाठवावा.

दिनांक १५/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेनंतर कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| पदाचे नाव | शिपाई |
| पदाची संख्या | ०१ |
| वेतन | रूपये १४५५०/— दरमहा मानधन |

**<u>शैक्षणिक अर्हता :—</u>** कमीत कमी ७ वी उत्तिर्ण

**<u>वयोमर्यादा</u>**

अ) उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १८ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग

किंवा महाराष्ट्र  शासनाव्दारे २८/०३/२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या मागासप्रवर्गाकरीता ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. वयोमर्यादेत वरील प्रमाणे शिथिलता मिळण्यासाठी जातीचा दाखला सादर करावा.

ब) शासन निर्णय क्र.एस. आर.व्ही — १०७७/३५७६/१८३३/१६:अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार  शारिरिकदृष्टया दिव्यांग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्य पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत  शिथिल केलेली आहे. त्यासाठी संबंधीत जिल्हा सरकारी रूग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला दिव्यंगत्वाचा दाखला सादर करावा.

**कराराची वैधता** :— नियुक्तीचा करार एक वर्षापर्यंत वैध असेल.

**करार संपुष्टात आणणे :—** उमेदवाराच्या सेवा त्याच्या / तिच्या कामगिरीचे मुल्यमापन केल्यानंतर कोणतीही सुचना आणि स्पष्टीकरण न देता कोणत्याही वेळी संपुष्टात आणल्या जाऊ शकतात.

**अधिकार** :— भरती प्रक्रीयेसंबंधी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार यांच्याकडे राखीव आहेत.

**उमेदवारांना सुचना :—**

**1-** उमेदवाराने प्रस्तुत जाहीरातीसोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज,प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र तसेच आवश्यक दस्तऐवज सादर करावेत.

२. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र फोटो अर्जावर दिलेल्या जागी लावावे.

३. उमेदवाराने एका सन्मानीय व्यक्तीची जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेला चारित्रयाचा दाखला सादर करावा, तसेच त्यांचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली / चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे. असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

४. विहीत नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
५. सदर जाहिरातीत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवलेले आहेत.
६. वरील निकषानुसार पात्र उमेदवारांची २० गुणांची क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी परिक्षा घेतली जाईल. या चाचणीमध्ये उमेदवारांच्या हालचालीतील चपळाई व तत्परता न्यायालय इमारत आणि आवाराच्या स्वच्छतेमधील उमेदवारांचे कौशल्य व चपळाई उमेदवाराकडून प्रत्यक्ष काम करून घेवुन तपासले जाईल. त्याच प्रमाणे उमेदवारांची एकुण ३० गुणांची मौखिक चाचणी घेण्यात येईल.
७. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक पात्रतेसाठी गुणपत्रक/ प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.
८. उमेदवारांनी लहान कुटुंबाबतचे प्रतिज्ञापत्र नमुना — अ प्रमाणे सादर करावा.
९. उपरोक्त पदासाठी वर नमुद केल्याप्रमाणे दरमहा मानधन मिळेल. त्याव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते/आर्थिक लाभ मिळणार नाहीत. तसेच लोकअभिरक्षक योजनेत नमुद रजेव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची रजा मिळण्याचा हक्क असणार नाही.
१०. क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी आणि मौखिक चाचणी मध्ये एकत्रितरित्या सर्वात जास्त गुण प्राप्त करणा—या उमेदवाराची निवड करण्यात येईल.
११. उमेदवारांना चाचणी परीक्षांसाठी निश्चित केलेल्या तारखांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
१२. भरती प्रक्रिया प्रस्तुत जाहीरातीत नमुद वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येईल. सदर वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटना घडल्यास बदल होवु शकतो. असा बदल वेळोवेळी या कार्यालयाच्या सूचनाफलकावर अधिसुचित करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाच्या

अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.त्याबाबत उमेदवारांना व्यक्तीश स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.

१३. भरतीबाबतची, निकालाबाबतची व निवडीबाबतची सुचना केवळ जिल्हा न्यायालय, नंदुरबार अधिकृत संकेतस्थळ https://nandurbar.dcourts.gov.in येथे प्रसिध्द करण्यात येईल.

१४. शिपाई पदावर निवड करून नियुक्ती केलेल्या उमेदवारास लोकअभिरक्षक सुधारीत योजना २०२२ मध्ये नमुद अटि व शर्ती लागु राहतील.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार

नुकताच
काढलेला
पासपोर्ट
आकाराचा
छायाचित्र

## शिपाई पदासाठी अर्ज

अर्जदाराचे नांव : ————————————————————————————————————————

(प्रथम नांव) (वडीलांचे/पतीचे नांव) (आडनांव)

संपुर्णपत्ता :— ——————————————————————————————————————————

भ्रमणध्वनी क :— ——————————————————————————————————————————

ई—मेल :— ——————————————————————————————————————————

जात व प्रवर्ग :——————————————————————————————

जन्म दिनांक :——————————————————————————————

उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय :.————वर्ष————महिने————दिवस

शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

इतर कामामध्ये विशेष रूची :————————————————————————————————————

किंवा अनुभव असल्यास

————————————————————————————————————

उमेदवाराला ओळखणा—या एक

——————————————————————————————————

प्रतिष्ठीत व्यक्तीचे नाव व पत्ता

——————————————————————————————————

तसेच त्याचे सदरील प्रमाणपत्र

————————————————————————————————————

अर्जासोबत सादर करावेत.

———————————————————————————————————

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो/ करते की मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरूध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही व माझे विरूध्द गुन्हा दाखल झालेला नाही. मी याव्दारे

शपथपूर्वक कथन करतो/ करते की अर्जात नमूद केलेली माहिती खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड/ नेमणूक झाल्यास, माझी सेवा कोणतीही नोटीस सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल.

दिनांक :— / /२०२५ अर्जदाराचे नाव व सही

# <u>नमुना "अ"</u>

मी श्री/श्रीमती/ कुमारी ——————————————————————————

राहणार——————————————————————————————————————

————————————————याव्दारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

१. मी शिपाई या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे

२. आज रोजी मला——————(संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ——आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :—

दिनांक:— / /

उमेदवाराची स्वाक्षरी

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी अर्जदार————————————————————————————————— याव्दारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो/ करते की/ सांगतो/ सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझे विरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरूध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

दिनांकः— / /

अर्जदाराचे नाव व सही

**नमुना "ब"**

**चारित्रय (वर्तणुक) प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/ श्रीमती ———————————————————————,

राहणार ————————————————————————यांना मी मागील ————वर्षापासून ओळखतो. त्यांची वर्तणुक व चारित्रय चांगले आहे. सदर अर्जदार माझे नातेवाईक नाहीत.

करिता सदरहू वर्तणुक / चारित्रय प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ :—

दिनांक:— / / प्रमाणपत्र देणा—याची सही

प्रमाणपत्र देणा—याचे नाव व पत्ता :—

——————————————————————————

——————————————————————————

——————————————————————————

भ्रमणध्वनी क्रमांक———————————————————

# भरतीचे वेळापत्रक

| प्रक्रिया | दिनांक |
|---|---|
| अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपावेतो किंवा त्यापुर्वी. |
| प्राप्त अर्जांची छाननी | दिनांक १६ सप्टेंबर,२०२५ |
| पात्र उमेदवारांची क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी परिक्षा | दिनांक १८ सप्टेंबर,२०२५ रोजी सकाळी ०९.३० वाजता |
| मौखिक चाचणी परिक्षा | दिनांक १९ सप्टेंबर,२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता. (टिप— क्रियाशिलता चाचणी व मौखिक चाचणी परिक्षेसाठी उमेदवारांनी वर नमुद वेळेपुर्वी अर्धातास अगोदर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,जिल्हा न्यायालय आवार, टोकरतलाव रोड, नंदुरबार येथे आधारकार्डासह व मुळ दस्तऐवजांसह उपस्थित रहावे.) |